# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९९–२०१०/ दिनांक :

सौं. सुमन दत्ताजीराव पाटील,
मु.पो. भडकंबे, ता. वाळवा. जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, आष्टा, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>**कोरम**</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारदार सौं. सुमन दत्ताजीराव पाटील, यांनी अनुसूचि अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे दि. ३०.४.२०१० रोजी खालील कारणांवरुन तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी आपल्या दि. १३.५.२०१० चे मंचाला अग्रेषित केलेल्या अर्जात कथन केल्याप्रमाणे भडकंबे, ता. वाळवा. जि. सांगली येथील शेती गट क्र. १११ मधील अर्ध्या हिश्याची वडिलोपार्जित मालकीहक्काचे वहिवाटीत १९९६ मध्ये वीज जोडणीसाठी अर्ज केला होता.

त्यानुसार दि.१.२.१९९६ रोजी कोटेशनचे पैंसे पावती क्र. ०८३६२८७ नुसार भरले. दि. १६.१२.२००९ रोजी जादा सुरक्षा ठेव रु. १५००/– पावती क्र. ४८५५५८५ ने भरलेली पावती परिशिष्ट अ सोबत जोडली आहे. परंतु त्यांना अद्यापपर्यंत वीज जोडणी मिळालेली नाही. म्हणून त्यांनी प्रथमत: अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दिली. अंतर्गत कक्षाने दि. ७.४.२०१० ला न्यायालयीन वाद असल्याने कनेक्शन देता येत नाही असा निर्णय दिला. त्याच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचासमोर दाखल केले आहे व दि. १३.५.२०१० च्या अर्जात अंतर्गत कक्षाच्या निर्णयाबद्दल आक्षेप घेतला आहे, तो एकतर्फी व सुनावणी न घेता झाला आहे. अंतर्गत कक्षाच्या निर्णयामध्ये इस्लामपूर येथील दि. १३.३.२०१० कोर्ट हूकूमाचा उल्लेख आहे. त्याप्रमाणे जमीन गट क्र. ४ व १११ मध्ये जैंसे थे चे आदेश झाले नाहीत किंवा अशा हूकूमाचा अर्जदाराच्या लाईट कनेक्शनशी काडीमात्र कसलाही संबंध नसून सदर हूकूमाचा लाईट कनेक्शनशी निगडीत नाही.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.५.२०१० च्या लेखी अहवालात दि. ५.७.१९९६ रोजी सदर अर्जदारास टेस्ट रिपोर्ट १५ दिवसांत न दिलेस ज्येष्ठता यादीतून तक्रारदाराचे नांव वगळण्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती, परंतु त्यांनी नोव्हेंबर २००९ पर्यंत विद्युत पुरवठा जोडणी करुन घेतलेली नाही. अर्जदार यांनी डिसेंबर २००९ मध्ये अर्ज केल्याने सुधारित दराने चलन भरुन चाचणी अहवाल सादर केल्यानंतर वीज जोडणी आदेश शाखा कार्यालय कोरेगांव यांना लेखी स्वरुपात देण्यात आला. परंतु सदर वीज जोडणी करेतेवेळी श्री. संपत धोंडीराम पाटील, रा. भडकंबे यांनी वीज जोडणी करण्यास हरकत घेतली व सदर जागेबाबत न्यायालयात वाद आहे व केस इस्लामपूर न्यायालयात चालू असल्याबाबत कागदपत्रे व तक्रार अर्ज सादर केला, त्यामुळे सदर वीज जोडणी करण्याचे काम स्थगित ठेवण्यात आले आहे. वितरण कंपनीने त्यांच्या विधी सल्लागारांकडून सल्ला घेतला, त्यानुसार सद्यस्थितीत तक्रारदार यांना गट क्र. १११ मध्ये वीज जोडणी देता येणार नाही असा अभिप्राय दिला आहे. तसेच तक्रारदार यांचे पती श्री. दत्ताजीराव पाटील यांनी विहीरीचा एक हिस्सा त्यांचे गट क्र. १११ श्री. उमेश पाटील यांना विकलेला आहे. त्याची खरेदी दि. १.८.२००७ रोजी झालेली आहे. सदर क्षेत्राचा आकार ०.२५ आर इतका आहे. दि. १२.३.२००८ चे इस्लामपूर सिव्हील कोर्टाच्या आदेशानुसार गट क्र. ४ब व गट क्र. १११ या जागेस जैंसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश झाल्यामुळे तक्रारदार यांना विद्युत जोडणी न देण्याचा सल्ला देण्यात आलेला आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी सौं. लता संदीप चोथे हजर. वि.प.तर्फे श्री. वर्धन, सहाय्यक अभियंता, आष्टा उप विभाग, श्री. सपकाळ, कनिष्ठ अभियंता, कोरेगांव शाखा कार्यालय उपस्थित. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी मंचासमोर प्रतिपादन केले की, सन १९९६ ला कनेक्शन मंजूर झाले होते, त्यानंतरही अर्ज करुन पैंसे भरले, परंतु वीज जोडणी दिली नाही. तसेच गट क्र. १११ मधल तथाकथित खरेदीखताप्रमाणे विहीरीचा हिस्सा विकला नाही असे ठामपणे सांगितले. इस्लामपूर दिवाणी न्यायालयाचे जैंसे थे आदेश याचा प्रस्तुतच्या तक्रारीतील वीज जोडणीच्या मागणीशी कांही संबंध नाही. अंतर्गत कक्षाने एकतर्फी निकाल दिला तो रद्द करावा अशी मागणी केली.

या उलट, वि.प.तर्फे श्री. वर्धन, सहाय्यक अभियंता, आष्टा उप विभाग, श्री. सपकाळ, कनिष्ठ अभियंता, कोरेगांव शाखा कार्यालय उपस्थित. त्यांनी असे प्रतिपादन केले की, परंतु सदर वीज जोडणी करेतेवेळी श्री. संपत धोंडीराम पाटील, रा. भडकंबे यांनी वीज जोडणी करण्यास हरकत घेतली. त्यानंतर लेखी अर्ज दिला. विधी सल्लागारांचे मत घेतले. कोर्टाचे आदेश असलेने वीज जोडणी करु नये असे मत दिले आहे. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार सौं. सुमन द. पाटील यांना वीज जोडणी करण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य व कायदेशीर होईल का ?

उत्तर : नाही

२) आदेश ?

खालील प्रमाणे.

कारणमिमांसा

उभयबाजूंचे कथनानुसार तक्रारदार यांना सुरुवातीस फेब्रुवारी १९९६ मध्ये वीज जोडणी त्यांचे अर्जानुसार मंजूर केली होती. त्यानंतर वाढीव रक्कम डिसेंबर २००९ भरली हेही मान्य आहे. वीज जोडणी आदेश दिल्यानंतर प्रत्यक्ष जोडणीचेवेळी हरकत आल्याने थांबले आहे. श्री. संपत धोंडी पाटील यांच्या हरकतीबद्दल तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी असे प्रतिपादन केले की, दि. १.८.२००७ चे खरेदीपत्रानुसार विहीरीचा हिस्सा विकलेला नाही व वीज जोडणी व दिवाणी दाव्याचा प्रस्तुत प्रकरणाशी दुरान्वयेही कांही संबंध नाही. वि.प.चे कनिष्ठ विधी अधिकारी, सांगली यांनी अभिप्रायात दिवाणी न्यायालयाचा आदेश असलेने वीज जोडणी देवू नये असे म्हटले आहे. असे असले तरी, तक्रारदारातर्फे दि. १.८.२००७ चे खरेदीपत्राची झेरॉक्स प्रत हजर केली. सकृतदर्शनी खरेदीच्या मजकुरावरुन विहीर विकली नाही असे वाटते, परंतु खरेदी पत्राच्या पान क्र. ८ वर विकलेल्या जमिनीच्या चतु:सिमा –

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | गावठाण |
| दक्षिणेस | : | सदर नंबरमधील धोंडीराम दादा पाटील यांची आठ आणे हिस्सेची जमीन |
| पश्चिमेस | : | भुजंगा गावडे (धनगर) यांची जमीन |
| उत्तरेस | | |

: हंबीरराव पांडुरंग पाटील यांची जमीन

येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमीन झाडझाडोरा वगैरे तदंगभूत वस्तुसह तुम्ही माझे चुलत भाऊ असलेने प्रेमाने व खुषीने रक्कम रुपये २५,०००/– या नाममात्र किंमतीस कायम व खुष खरेदी लिहून देऊन जमीन आज रोजी असले स्थितीत तुमचे कब्जात दिली आहे.

यावरुन सदर जमिनीवर असलेल्या विहीरीच्या हक्कासह विकला असा अर्थ काढावा लागतो किंवा तक्रारदाराचे प्रस्तुत प्रकरणातील म्हणण्यानुसार दिवाणी न्यायालयाच्या आदेशात जैंसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश या प्रकरणाशी निगडीत नाही व कोर्टाचे आदेशात बदल करुन घेतल्याशिवाय तक्रारदाराचे प्रतिनिधी सौं. लता संदीप चोथे यांचे म्हणणे ग्राह्य व कायदेशीर मानता येणार नाही. असे दिसते की, दावा क्र. ३५६/८२ यामध्ये तक्रारदार यांचे पती श्री. दत्ताजीराव धों. पाटील हे प्रतिवादी आहेत. दाव्यात दुरुस्ती करुन श्री. दत्ताजीराव पाटील यांचे तर्फे खरेदीदार श्री. उमेश पाटील यांना प्रतिवादी केले आहे व दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर यांनी दि. १२.३.२००८ रोजी दावा गट क्र. ४ ब व गट क्र. १११ मध्ये जैंसे थे परिस्थिती ठेवण्या बाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे हरकतदार श्री. संपत धोंडीराम पाटील यांनी वीज जोडणीचेवेळी किंवा वीज जोडणी देत असतांना दि. २३.१२.२००९ रोजी हरकत घेतली व गट क्र. १११ मधील विहीरीवर नवीन वीज कनेक्शन कोणासही देवू नये असे अर्जात म्हटले आहे. सदर कनेक्शन देणेस हरकत आहे.

सदर जमीनीबाबत दिवाणी न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असून न्यायालयाने जैंसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.

यामुळे वि.प.ने मंचासमोर दाखल केलेल्या म्हणण्यानुसार श्री. संपत धों. पाटील यांनी हरकत घेतली असल्याने व दिवाणी न्यायालयाचा जैंथे परिस्थिती ठेवण्याचा आदेश असल्याने वीज जोडणी देता येणार नाही हे वि.प.चे म्हणणे ग्राह्य धरावे लागेल. अशा परिस्थितीत, जो पर्यंत दिवाणी न्यायालयाच्या दि. १२.३.२००८ च्या जैंसे थे परिस्थिती आदेशात बदल होत नाही तो पर्यंत तक्रारदाराचे मंचासमोर वीज जोडणी मिळण्याच्या गाऱ्हाण्याचा मंचास निवारण करता येणार नाही असे मंचाचे मत झाले आहे. केवळ याच कारणावरुन कारणावरुन दिवाणी न्यायालयाचा आदेशा असल्याचे तक्रारदार यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली असतांना व वि.प. जोडणी देणेस तयार असूनही अशा वीज जोडणीचे आदेश देणे कायदेशीर व योग्य होत नाही. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे आहे.

वरील मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी दिल्याने तक्रार फेटाळणे संयुक्तिक होईल.

## आदेश

१) सौं.सुमन दत्ताजीराव पाटील, मु.पो. भडकंबे, ता. वाळवा. जि. सांगली यांची मंचासमोर वीज जोडणी मिळणे बाबत दि. ३०.४.२०१० ची दाखल तक्रार केवळ इस्लामपूर दिवाणी न्यायालयाचा दावा क्र. ३५६/८२ मधील दि. १२.३.२००८ च्या आदेशामुळे निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :